Volume-2 (2021)
Special Issue-1
**RESEARCH HUB**
International Peer-Reviewed Multi-Disciplinary E-Journal
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महार विषयक ऐतिहासिक दृष्टिकोण

**डॉ. प्रमिला डी. भोयर**
सहा. प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख,
स्व. निर्धन पाटील वाघाये कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, लाखनी,जि. भंडारा
9765889913
bhandarkarpriyansh@gmail.com

**प्रस्तावना:-**

विषमताग्रस्त समाजरचनेत अस्पृश्यांच्या वाटयाला नरकतुल्य यातना व पशुतुल्य जीवन या दोन्ही बाबी आलेल्या होत्या. शतकानुशतके भारतातील दलित ( अस्पृश्य ) समाज कसे जीवन जगत होता हे मनुस्मृतीतील तथा पेशवेशाहीतील अस्पृश्यांवरील अन्याय अत्याचार युक्त बखर वाङ्मयातील कथामधून ऐतिहासिक दाखल्यामधून ग्रॅंड डफ प्रस्तुत रिपोर्टस मधून प्रतिबिंबित होणाऱ्या मानवतेस कलंकित करणाऱ्या अमानुष घटनांमधून दिसून येते. दलित वर्गाला न्याय हक्क मिळवून देणाऱ्या विसाव्या शतकातील भारतातील युगप्रवर्तक क्रांती सूर्य महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आमुलाग्र परिवर्तनवादी आहेत. त्यांच्या चळवळी सबाह्यातंर मानवकल्याणकारी आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य केवळ समाजसुधारणेचेच नाही, अस्पृश्यता निर्मूलनाचेच नाही तर त्यांचे कार्य एक अदभूत अनुपमेय क्रांतिकार्य आहे. जीवनाच्या सर्वागांस परिसस्पर्शाच ते कार्य आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य केवळ संघर्ष लढा अथवा चळवळी या स्वरुपाचेच नाही तर त्यांचे कार्य एक अदभूत 'अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चालविलेल्या संघर्षास यथार्थ असे नाव दिले आहे.

आधुनिक भारताच्या इतिहासातील झुंझार व्यक्तीमत्व असलेले जीवनवादी, शास्त्रीय, मानवतावादी, समाजशील आणि प्रज्ञा याचं सुवर्णसंगम साधणारे शिक्षण, अभिप्रेत असलेले महामानव क्रांतीसुर्य डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांना आपल्या पूर्वायुष्यात अस्पृष्यतेचे भयानक चटके सोसावे लागले. आंबेडकर घराणे हे मूळ कोकण विभागातील रत्नागीरी जिल्ह्यातील मंगलगड तालुक्यापासून पाच मैलावरील आंबावडे या गावचे होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म मध्यप्रदेशातील इंदोर जवळील महू येथे झाला. त्यांचे वडील त्यावेळी महू येथील सैनिकी कॅम्पमध्ये सुभेदार पदावर होते. भीमरावाचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी भीमावाईच्या पोटी झाला. भीमराव हे चौदावे रत्न होय, ते केवळ पाच वर्षाचे असतांना इ.स. १८९६ मध्ये मातृसुखाला पारखे झाले. त्यामुळे त्यांचा प्रतीपाळ 'मीराबाई' या त्यांच्या आत्याने केला. भीमरावाचे वडील सैनिकी कँप मध्ये होते, तेव्हा त्यांना अस्पृश्यतेचा तेवढा अनुभव आला नव्हता. सैनिकी सेवेतून निवृत्त झाल्यावर त्यांचे वडील कोकणात ( १८९४ ) वास्तव्यास राहिले पश्चात ते मुंबई येथे आले. कोकणतील वास्तव्यात व नंतर मुंबई येथे तसेच अन्यत्रही भीमरावांना अस्पृश्यतेचा जाच सहन करावा लागला.

भीमाच्या लहानपणातील काही अस्पृश्यचे जाचक अनुभव खालील प्रमाणे.

१ ) शाळेत तहान लागल्यास परिचराने नळ सुरु करावे व भीमरावास तहान भागवावी लागत असे . परिचर नसेल तर तसेच राहावे लागत असे.

२ ) न्हावी अस्पृश्यांची कटिंग करीत नसत. भीमरावांची मोठी बहिण भीमराव तसेच त्यांचे मोठे भाऊ यांचे केशकर्तन करीत असे.

३) कापड दुकानदार अस्पृश्य गिऱ्हाईकांच्या हाती कापड देत नसे कापड देण्यापूर्वी कापडास धूळ चोळण्याची प्रथा होती, हेतू हा की कापड मळकट दिसावे . दुरुन फेकूनच अस्पृश्याच्या हाती कापड देण्याची प्रथा होती.

४ ) सार्वजनिक स्थळी पाणवठे , सार्वजनिक नळ , हॉटेल इ . सर्व ठिकाणी अस्पृश्यांना अत्यंत असह्य अपमानास्पद प्रसंगाना तोंड द्यावे लागत असे.

५) अस्पृश्य विद्यार्थी म्हणून भीमरावांना हायस्कूलमध्ये संस्कृत हा भाषाविषय घेता आला नाही . जातिनिष्ठ संस्कृत शिक्षक अस्पृश्य विद्यार्थ्यांना संस्कृत शिकविण्यास तयार नव्हते आनिच्छेनेच त्यांना संस्कृतऐवजी पर्शियन शिकणे भाग पडले.

६ ) रामजीबाबा सेना कँपमधील चांगले क्रिकेटर होते. भीमरावांना क्रिकेट खेळणे आवडत असे. पण अस्पृश्य विद्यार्थ्यास तत्कालीन शिक्षक क्रिकेट खेळण्याची संधी देत नसत.

७ ) एखादा बाल भिम स्पृश्य हिंदूच्या पाणवटयावर पाणी पिताना सापडला तेव्हा त्याला काळानिळा होईपर्यंत स्पृश्य हिंदूनी गुरासारखा बदडला.

बालवयापासून भीमाला अस्पृश्यतेचे चटके सहन करावे लागले काही अस्पृश्यतेचे अनुभव अधिकच दाहक होते .

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समाजक्रांतीकारक युगंधर होते दलितांच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणे हे त्यांच जिवित ध्येय होते. "गुलामाला त्यांच्या गुलामीची जाणीव करुन द्या म्हणजे तो बंड करुन उठेल" या अब्राहम लिंकनच्या वक्तव्यावर बाबासाहेबांची श्रद्धा होती. स्वतःबाबासाहेब आंबेडकरांनी दलितांना 'शिका, संघटित व्हा व संघर्ष करा' अस आत्मोद्धाराचा मूलमंत्र दिला. दलित समाज म्हणजे (प्रस्तापिताकडून) सर्वस्व हिरावून घेतलेला पूर्णत:वंचित असा (सामाजिक धार्मिक आर्थिक दृष्टया) पशूवत व प्रतिष्ठेच्या तथा जैविकदृष्टया प्रेतवत समाज होता. अशा समाजात जाणिव जागृती व स्वाभिमान चेतना जागविण्याचे खडतर अभियान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अंगीकृत केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर दिनांक 13 जुन 1953 रोजी रावळी कॅप मुंबईच्या भाषणात ते म्हणाले 'शीलाशिवाय शिक्षणाची किंमत शून्य आहे'. ज्ञान हे तलवारीसारखे आहे समजा एखादया मानसाच्या हाती तलवार आहे तिचा सदउपयोग की, दुरूपयोग करावयाचा हे त्या माणसाच्या शीलावर अवलंबून राहील तो त्या तलवारीने एखादयाचा खुनही करील किंवा एखादयाचा बचावही करील ज्ञानाचे तसेच आहे. म्हणुन शिल हे जीवनाला अत्यंत आवश्यक आहे. शिल नसल्यामुळे आपले नुकसान हाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे थोर राष्ट्रभक्तांपैकी एक महान युगप्रर्वतक महापुरूष होता त्यानी या देशाची पुनर्रचना समतेच्या तत्वावर करण्याकरीता आयुष्यभर संघर्ष केला. बाबासाहेबांचे मते, भारतातील विषमतावादी समाज व्यवस्थेमूळे सर्वसामान्य माणसाला (दलितास) आपला विकास करण्याची संधी लाभत नाही म्हणुन भारतात संविधानाने "एक व्यक्ती एक मत" हे तत्व स्वीकारून राजकीय समतेचा उद्घोष जरी केला असला तरी समाजिक व आर्थीक समता प्रस्थापित झाल्याशिवाय भारताला आपला सर्वागीण विकास साधने शक्य होनार नाही. भारतात ही समाजक्रांती घडवून आणण्याकरीता शिक्षण हेच एक प्रभावी साधन आहे. यावर बाबासाहेबांचा ठाम विश्वास होता म्हणुन प्रत्येक भारतीयाला शिक्षण हे मिळायलाच पाहीजे. असा त्यांनी आग्रह धरला. शिक्षण हे प्रत्येक भारतीयांचा मुलभूत आधिकार आहे, व तो त्यांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून प्रत्येक भारतीयास बाहाल केला आहे. डॉ. आंबेडकरांनी शैक्षणिक तत्वज्ञानाचे महत्व विशद करून भारतात

सामाजीक विषमता टिकून राहण्यास लोकांचे अज्ञान हेच एक कारण आहे म्हणुन लोकांना सज्ञान करण्यासाठी शिक्षण हे एक अमोघ शस्त्र आहे ज्याने दृष्टांचा संहार करता येतो आणि दृष्टापासून स्वताचे रक्षणही करता येते. 'विद्या हे मनुष्याचे सुंदर रूप आहे'. पुढे डॉ. बाबासाहेब म्हणतात, 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे' जो ते प्राशन करील तो समाज व देश विघातक कृत्यांविरूध्द गुरगुरल्याशिवाय राहणार नाही".

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मानवाचा सर्वांगीण विकास व्हावा या करिता विविध सामाजिक, राजकीय व धार्मिक पातळयांवर लढे उभारले. या विषमतामय देशात धर्मशास्त्रचा आधार घेऊन अस्पृश्यता व जातीभेदासारख्या रूढीद्वारे कोटयावधी माणसांना माणूसकीच्या साध्या हक्कांपासून वंचीत केले गेले. त्यांच्या ज्ञान संपादनाचा अधिकार काढून त्यांच्या माथी अस्पृश्येतचा कलंक लादला व गावाबाहेरच्या उकीरडयावर विटाळांचे, तिरस्कारांचे, अपमानाचे, अज्ञानाचे, दारिद्राचे व गुलामगिररीचे लांच्छनास्पद जीवन जगण्यास भाग पाडले. शेकडो वर्ष ही सामाजिक गुलामगिरी लादली गेल्यामुळे त्याच्यामध्ये हिनतेची भावना निर्माण होऊन आपले आयुष्य हे गुलामी करण्याकरीताच आहे असा विघातकपणा हयांच्या नजरेस आणण्याकरीता ज्ञान वा शिक्षण हेच एकमेव प्रभावी साधन आहे हे बाबासाहेबांनी ओळखले.

निरक्षण जनतेला त्यांच्या गाढ झोपेतून जागे करण्याचे अवघड कार्य डॉ. आंबेडकरांनी करावयाचे होते, त्यांनी तुतारी फुकुन त्यांना हाक दिली. 'शिका, संघटित व्हा व संघर्ष करा' समाजाच्या उच्च स्तरावर आपली प्रगती आणि एकात्मीकरण व्हावे म्हणून आणि मानवी प्राणि म्हणून आपली योग्यता आणि आपली शक्ती वंचीत जनतेने पून्हा प्राप्त करावी म्हणून त्यांनी आत्मसहाय्य, आत्मअवलंबन आणि आत्मसन्मान यांची चळवळ सुरू केली. डॉ. आंबेडकरांनी सामाजिक परिवर्तनाची तरफ म्हणून आणि सामाजिक अभियांत्रिकीचे हत्यार म्हणून शिक्षणाचा पाठपुरावा केला. ज्याला देशीय मुलाधार आहे, असे शैक्षणिक तत्वज्ञान प्रतीपादन करून निरक्षर जनतेमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी शैक्षणिक संस्था स्थापन केल्या. त्यांचे शैक्षणिक तत्वज्ञान आणि कार्य अजुन व्यापकतेने ज्ञात झालेले नाही. वस्तुस्थिती अशी आहे की, मानवी विचारांचा आणि कार्याचा या क्षेत्रामध्येसुद्धा त्यांनी सखोल अंशदान केलेले आहे.

एकदा त्यांनी अस्पृश्याला सांगितले, 'तुमची गुलामगिरी तुम्ही स्वतः नष्ट केली पाहीजे, स्वतःच्या आत्मसन्मान हरवून जगणे हे लांछनास्पद आहे'. आत्मसन्मान ही जीवनातील अत्यंत आवश्यक अशी गोष्ट आहे. तिच्याशिवाय मनुष्य केवळ शुन्यवत होतो, आम्ही गुलाम नाहीत आम्ही लढवय्या कुळातील आहोत. त्यांनी प्रतिपादन केलेले शैक्षणिक कार्य मनुष्याचे डोके, हदय आणि हात यांच्या अंतर्गत गुणवत्ताना जोपासणारी प्रक्रिया म्हणुन शिक्षण संकल्पित करत ते माणसांना आंगीभुत मुरलेल्या शक्ती मुक्त करत आणि पशुतुल्य अस्तीत्वाच्या पातळीवरून ते त्याग, विशुध्दता, सदगुन आणि सात्वीकता यांच्या पातळीपर्यंत उन्नत करते. डॉ. आंबेडकर यांना शिक्षण हे आत्यातीक ऐहिक वाटत होते आणि त्याच्याशिवाय जीवनामध्ये दुसरे कोणतेही हीत प्राप्त करून घेणे शक्य नव्हते. ते म्हणाले होते की, सर्व प्रकारच्या विषमता दुर करण्यासाठी आणि सामाजिक लोकशाही प्राप्त करून घेण्यासाठी शिक्षण हा एक राजमार्ग होता तसेच शिक्षणाचा हेतु लोकांचे नैतीकरण आणि सामाजीकीकरण करणे हा होता. सभ्यता आणि संस्कृती याचा शिक्षण हा पाय होता, असे त्यांनी जाहीर केले. आज मागासवर्गीय शैक्षणिक सोई सवलती मिळाल्यामूळे हया समाजांनी शैक्षणिक क्षेत्रात झपाटयाने प्रगती केल्याचे दिसून येत आहे. आज लाखो विदयार्थी उच्च शिक्षण घेऊन नोकरीत आरक्षणाच्या सवलतीमुळे शासनात व प्रशासनात महत्वाची पदे भुषवितांना दिसत आहेत. गावाबाहेरच्या ओगळ उकीरडयावर, एकेकाळी उष्ट्या अन्नावर जगणारा अस्पृश्य समाज अस्पृश्यतेच्या

जीवनातून मुक्त होऊन सन्मानाने जगत आहे. याचे सर्व श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या आयुष्यभराच्या महान मानवी संग्रामाला आहे, यात शंका नाही.

**निष्कर्ष:-**

आजच्या शिक्षणाला पोटभरू व बाजारू स्वरूप येऊन आजचे शिक्षण हे मुठभर व्यापारी व राजकारण्यांच्या हातचे बाहुले बनले आहे . परिणामी शिक्षकासारख्या पवित्र पेशाही आज शिक्षणाचा धंदा करणाऱ्या खाजगी शिक्षणसंस्थामध्ये पैसा दिल्याशिवाय मिळत नाही व जो पैसा देऊन शिक्षकाची नोकरी मिळवेल त्याच्या हातून देशाचे भवितव्य घडवीणारी पिढी निर्माण होईल अशी कल्पनाही करणे मुर्खपणाचे ठरणार आहे. यातून जर आजच्या शिक्षणाची सुटका करावयाची असेल तर ज्या देशभक्त, विचारवंत वे राष्ट्रनेत्यांनी या देशाला घडविण्यास अतोनात कष्ट केले आपल्या जीवाचे राण केले प्रसंगी आपल्या प्राणाची आहुती देण्यासही मागेपुढे पाहीले नाही. त्या राष्ट्रभक्त, विचारवंताच्या उदात्त विचारतत्वज्ञानाची आजच्या शिक्षणाला कास धरणे आवश्यक आहे. त्यांच्या जीवण तत्वज्ञानाचा शिक्षण अभ्यासक्रमात समावेश होण्याची आज नितांत गरज आहे. आता गरिबांच्या शाळाच बंद पडायच्या मार्गावर आहेत महात्मा बुध्द म्हणाला होता, ' माणसाच्या सर्व प्रश्नाची मूळ त्यांच्या अज्ञानात आहेत, भारतात आता अज्ञान कसे टिकले जाईल हेच पाहील जातंय'.

**उपाय:-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'मुक्तिसंग्रामामुळे' दलितांमध्ये (अस्पृश्यांमध्ये) आमुलाग्रह परिवर्तन झाले. पण सामाजातील अस्पृश्यता पूर्णपणे नष्ट झालेली नाही अस्पृश्यतेची प्रमाण शहरांपेक्षा खेडयात जास्त प्रमाणात दिसून येतात. अस्पृश्यांनमध्ये परिवर्तन होण्यसाठी बाबासाहेबांनी आपल्या चळवळीचा केंद्रबिंदू 'शिक्षण' ठरविले होते. पण आजही समाज विषमताग्रस्त आहे. अस्पृश्यांमध्ये सुद्धा जाती पोटजातीत भेदभाव मानतात. त्यांच्यात बेटीव्यवहार अजुनही फारशा प्रमाणात होत नाहीत. बाबासाहेबांची प्रेरणा घेऊण आणि आदर्श डोळयासमोर ठेवून जरी वागत असले तरी चांगले आणि वाईट हे ओळखतनाहीत. शिक्षण हे केंद्रबिदू मानले होते. पण आज शिक्षणाचां सुद्धा योग्य उपयोग होत नाही.शिक्षण हे पोट भरण्याचे साधन ठरले आहे. त्यामुळे शिक्षणाचा दर्जा घसरला आहे. शिक्षणावरील मक्तेदारी उठविली पाहीजे व त्यासाठी संघटीत होऊन संघर्ष केला पाहीजे नाहीतर सर्वात जास्त नुकसान खालच्या वर्गलाच होईल. तेव्हा त्यांनी वेळीच जागृत होऊन जन आंदोलनास गती दिली पाहीजे नाहीतर समतेवर आधारीत भारतीय लोकशाहीची भवितव्य धोक्यात येईल.

**संदर्भ सूची:-**

१) कीर धनंजय : विष्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर मानस आणि तत्वविचार ( गजानन बुक डेपो पुणे (१९७७))
डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र - पॉप्युलर प्रकाशन, मुंबई (१९८९)
२) खैरमोडे चा. भं. : 'भिमराव रामजी आंबेडकर' चरित्र ग्रंथ, खंड १, सुगावा प्रकाशन, पुणे (१९५८)
३) कसबे रावसाहेब : डॉ. आंबेडकर आणि कार्ल मार्क्स
डॉ. आंबेडकरवाद तत्व आणि व्यवहार, सुगावा प्रकाशन, पुणे (१९८९)
४) कुबेर वा. ना. : 'डॉ. आंबेडकर विचार मंथन' केसरी मुद्रपालय, पुणे,(१९७२)
५) केरकळ, भा. कृ. : भारतभूषण डॉ. आंबेडकर, सुगावा प्रकाशन, पुणे (१९९४)
६) कौसल्यायन भदत्न आनंद : 'संक्षिप्त बुद्दचर्या' सिद्धार्थ गौतम शिक्षण व संस्कृती समिती, धनसरी जी. अलिगड (१९८७)